भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/१०/२०१७

**१) पोस्ट आफीसमधुन सिओडी पार्सल व नोंदणी रजीस्टर चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३०/०९/२०१७ ते ०३/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मुख्य डाकघर मोठा बाजार भंडारा ला दिनांक ३०/०९/२०१७ ते ०२/१०/२०१७ ला सुट्टी असल्याने पोस्ट आफीस बंद हाते. दिनांक ०१/१०/२०१७ ला फक्त डाकवितरण व स्पीड स्पोस्टचे काम सुरु होते. दिनांक ०३/१०/२०१७ ला ०८.०० वाजता दरम्यान ऑफीसमधील कपाटाची कुंडी तुटलेली दिसुन आली व त्यातील १ सिओडी पार्सल किंमती ३,५४०/—रु. व नोंदणी रजीस्टर कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी अशोक कुमार धर्माजी भलावी वय ५५ वर्ष, रा. पोस्ट ऑफीस भंडारा पोस्ट मास्टर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहनाच्या धडकेत दोन जखमी :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे २१.३० ते २१.४५ वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी राजन महादेव देवगडे वय ४७ वर्ष रा. कोंरभी ह. मु. गणेशपुर हा त्याची मुलगी कुमारी प्रणाली देवगडे हिचे सोबत कोंरभी येथुन मोटार सायकल क्रमांक एम. एच. आर ५१९८ ने डब्बल सिट गणेशपुर कडे येत असतांनी यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला समोरुन धडक दिल्याने फिर्यादी व त्याचे मुलीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) टिप्परच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक ०४/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील जखमी दिलीप किसन सरोते वय ४५ वर्ष, रा. धारगाव हा त्याचे मोटार सायकलने शिवाजी चौक कडुन तहसिल कडे जात असतांना विरुध्द दिशने येणाऱ्या यातील आरोपी टिप्पर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीजपणे चालवुन मोटार सायकल चालकास धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ऊईके यांचे चौकशी अहवाल व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**४) जुण्या घरघुती वादावरुन शिवीगाळ, ढकलढुकल तसेच लोखंडी गेटला डोके आपटुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०४/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घरा समोरील रोडवर बसला असता यातील आरोपी हा फिर्यादी जवळ आला व काही न बोलता जुण्या घरघुती वादावरुन शिवीगाळ केली फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने फिर्यादीस ढकलढुकल करुन शेजारील देवराम तुमसरे यांचे घराचे लोखंडी गेटला डोका आपटुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सजंय रामचद्र बुराडे वय ४० वर्ष, रा. गोंडसावरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**५) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०४/१०/२०१७ चे १५.२० ते १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनी बस आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाच्या जिवीतास अडथळा तसेच धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सांबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) अवैध दारू अडयावर धाडी . :–**

दिनांक ०४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहनगर, कारधा, आंधळगाव, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून ३९ लिटर १८० मिली लिटर हा.भ. दारू किंमती ३,७५०/–रु, व ४७ लिटर ५२० मिली लिटर देशी/ विदेशी दारु किंमती १४,३२०/–रु. असा एकुण किंमती १८,०६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आले आहे.


05.10

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता